**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.३७/२०२२ – नि.२७ खालील आदेश</u>**

निवृत्ती वसंत गावडे वि. जमिला शौकतअली मुल्ला इ.

CNR NO. MHSO20–000146–2022

वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश २६ नियम ९ प्रमाणे कोर्ट कमिशन नेमणुकीचा अर्ज दाखल केला आहे.

२. वादी यांचे कथन असे की, वादीने सदरचा दावा प्रतिवादींचे विरुध्द शहर सांगोला हद्दीतील जमिन सर्वे नंबर ५३८/१ मधील वादीचे कब्जे वहिवाटीस प्रतिवादी यांनी दावा जमिनीत अतिक्रमण करून हरकत, अडथळे करु नयेत असा निरंतर ताकीदीचा दावा दाखल केलेला आहे. वादीची जमिन सर्वे नंबर ५३८/१ चे पुर्व बाजुस सांगोला – पंढरपूर स्टेट हायवे रस्ता असुन सदर रस्त्याच्या खाली प्रतिवादीची जमिन सर्वे नंबर ६६२ ही पुर्ण गेलेली आहे. त्यामुळे सर्वे नंबर ६६२ ही अस्तित्वात नसताना प्रतिवादी वादीची जमिन गट नंबर ५३८/१ मधील पुर्वेकडील क्षेत्र सर्वे नंबर ६६२ पैकी आहे असे समजुन वादीचे सर्वे नंबर ५३८/१ मधील कब्जे वहिवाटीस हरकत, अडथळे करीत आहेत. वादीने यापुर्वी मोजणी रजि. नंबर २५३७ प्रमाणे दि.२८/०५/२०१० रोजी सर्वे नंबर ६६२ ची मोजणी केलेली आहे. शिवाय वादीने वादीची जमिन सर्वे नंबर ५३७/१ ची मोजणी रजि. नंबर २५७३ प्रमाणे दि.०२/१०/२०११ रोजी केलेली आहे. वादीची दावा जमिन सर्वे नंबर ५३७/१ व प्रतिवादीची जमिन सर्वे नंबर ६६२ या दोन्ही जमिनीची अद्याप संयुक्त मोजणी झालेली नाही. त्यामुळे प्रतिवादीची जमिन सर्वे नंबर ६६२ ही पुर्णपणे मिरज–पंढरपूर हायवे रस्त्याखाली गेलेली आहे किंवा नाही हे ठरविणे अडचणीचे झालेले आहे. त्यामुळे सदर दाव्यात दावा जमिन सर्वे नंबर ५३७/१ व सर्वे नंबर ६६२ या वादी, प्रतिवादी यांच्या जमिनीची संयुक्त मोजणी टी.आय.एल.आर सांगोला यांचेमार्फत होणे न्यायाच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत जरुरीचे झालेले आहे. वादी, प्रतिवादी यांचेमध्ये असलेल्या हद्दीचा वाद वादी, प्रतिवादी यांच्या जमिनीची संयुक्त मोजणी केल्यास तो संपुष्टात येणार आहे. वादी कमिशन फी व प्रोसेस भरण्यास तयार आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. प्रतिवादी यांनी म्हणणे मांडले की, वादीचा प्रस्तुतचा अर्ज कायदेशीर नाही व अर्जातील कारण खरे नाही. वादी अर्जात नमूद करत आहे त्याप्रमाणे जागेवरील

वस्तुस्थिती नाही. वादींनी दाव्यासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये वादींचा सर्वे नंबर ५३८ चे पुर्वेस सर्वे नंबर ६६२ हा असलेचे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. सर्वे नंबर ६६२ चे पूर्वेस मिरज–पंढरपूर रोड दर्शविले आहे. वादीचे अर्जात नमूद प्रमाणे दाव्यातही खोटी वस्तुस्थिती दाखवून व मोजणी अधिका–यांशी संगनमत करुन यापूर्वी तयार करुन घेतलेले खोटे व चुकीचे मोजणी नकाशे व मोजणी रिपोर्ट याआधारे पुन्हा खोटी व चुकीची कागदपत्रे तयार करणेचे उद्देशाने प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. सर्वे नकाशामध्ये सर्वे नंबर ५३८ चे पूर्वेस सर्वे नंबर ६६२ व त्याचे पूर्वेस मिरज पंढरपूर रस्ता ही वस्तुस्थिती व सर्वे रेकॉर्ड वादी नाकारत आहे. वादींनी यापूर्वी दिलेला तुर्तातूर्त ताकीद अर्ज गुणावगुणावर चालून नामंजूर झालेला आहे. सदर तूर्तातूर्त ताकीद अर्जाचे हुकूमामध्ये वादींनी कथन केलेली सर्वे नंबर ६६२ व रस्त्याबाबतची वस्तुस्थिती मे. कोर्ट यांनी नाकारलेली आहे. त्यामुळे वादीने लिहून जावून पुरावा गोळा करणेच्या उद्देशाने प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. ताकीदीचे दाव्यात वादीने त्यांचा दावा कागदोपत्री शाबित करण्याचा आहे. त्यासाठी कमिशनर नेमण्याची कोणताही कायदेशीर तरतूद नाही. सबब, अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

४. वादी व प्रतिवादी तर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५. वादीचे असे कथन आहे की, वादीची जमिन सर्वे नंबर ५३८/१ मध्ये असून सदर मिळकतीच्या पुर्व बाजुस सांगोला–पंढरपूर महामार्ग आहे. प्रतिवादींची पुर्वी सर्वे नंबर ६६२ मध्ये जमिन होती. परंतु सर्वे नंबर ६६२ चे पूर्ण क्षेत्र व सर्वे नंबर ५३८/१ चे काही क्षेत्र मिरज–पंढरपूर हायवे रस्त्याखाली गेले आहे. प्रतिवादींचे असे कथन आहे की, सर्वे नंबर ५३८ च्या पूर्व बाजूस सर्वे नंबर ६६२ असल्याचे वादीनेच नमुद केले आहे व सर्वे नंबर ६६२ च्या पूर्व बाजूस वादीनेच मिरज–पंढरपूर रस्ता दर्शविला आहे. सबब, सर्वे नंबर ६६२ ची परिस्थिती वादीने मान्य केली आहे. त्यामुळे सर्वे नंबर ६६२ चे क्षेत्र रस्त्यामध्ये गेले आहे या वादीच्या कथनांमध्ये कोणतेही तत्थ्य नाही.

६. प्रस्तुतचा दावा वादींनी निरंतर ताकीदीचा दाखल केला आहे. दावा

निरंतर ताकीदीचा असला तरी हद्दीवरुन वाद असल्यास कोर्ट कमिशनची नेमणूक करण्यास कायद्यात्मक बाधा नाही. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये सद्यस्थितीमध्ये सर्वे नंबर ५३८/१ च्या पूर्व बाजूस सर्वे नंबर ६६२/१ ही प्रतिवादीची मिळकत आहे अथवा सांगोला पंढरपूर रस्ता आहे याबाबत वाद आहे. सबब, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये हद्दीवरुन वाद आहे. वादीने गट क्र.५३८/१ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादींच्या नावाची नोंद झाली आहे. वादींनी तसेच प्रतिवादींनी गट क्र.५३८/१ च्या पूर्व बाजूस गट क्र.६६२ असल्याचे नाकारलेले नाही. वादींचे असे कथन आहे की, गट क्र.६६२ मधील प्रतिवादींची जमिन रस्त्यामध्ये गेली आहे. सबब, वादी व प्रतिवादी एकमेकांचे लगत धारक असल्याचे दिसुन येते व त्यांच्यामध्ये हद्दीखुणावरुन वाद असल्याचे दिसुन येते. अशा परिस्थितीमध्ये कोर्ट कमिशनरमार्फत वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतींची संयुक्त मोजणी झाल्यास अतिक्रमण असल्यास ते अभिलेखावर येईल व वाद विषयाचे निराकरण करणे सोपे होईल.

७. वादी व प्रतिवादींच्या मिळकतींची मोजणी झाल्यास दावा मिळकतीची सत्य परिस्थीती अभिलेखावर येणार आहे. त्यामुळे न्यायालयास मदत होणार आहे. दाव्यातील मागणी पाहता दावा मिळकतीची मोजणी झाल्यास दोन्ही पक्षकारांमध्ये वादाचा मुद्दा निष्पन्न होण्यास मदत होणार आहे. वादीचे प्रस्तुत अर्जातील व दाव्यातील कथन पाहिले असता प्रतिवादी वाद मिळकतीत अतिक्रमण करत असल्याचे वादीचे कथन आहे. अशा परिस्थीतीत वादीचा अर्ज मंजूर केल्यास दाव्याचा निर्णय गुणदोषांवर होणेस मदत होणार आहे. अर्ज मंजूर केल्याने प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. प्रतिवादींना मोजणी अहवालावर उलटतपास घेण्याची संधी मिळेल त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच कमिशन अहवाल दाखल झाल्याने दाव्याचा अंतिम निकाल झाला किंवा वादीची मागणी पूर्ण झाली असे म्हणता येणार नाही. त्यासाठी पुरावा देणे आवश्यक आहे. उभय पक्षकारांतील वादाचे निरसन होण्यासाठी न्यायालय आयुक्तांची नेमणूक करणे योग्य व संयुक्तीक वाटते. प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी युक्तिवादादरम्यान महत्वपूर्ण आक्षेप घेतलेला नाही. वादींनी जमिन सर्वे नंबर ५३८/१ व

६६२ या जमिनीची पोटहिश्यासह संयुक्त मोजणी टी.आय.एल.आर. सांगोला यांच्यामार्फत व्हावी अशी मागणी केली आहे. वादींनी मोजणी रजिस्टर नंबर २५३७ व २५७३ याचा विचार होवून मोजणी नकाशा व रिपोर्ट न्यायालयात दाखल करण्याबाबत विनंती केली आहे. एकंदरीत परिस्थिती विचारात घेता सर्वे नंबर ५३८/१ व सर्वे नंबर ६६२ या जमिनीची पोटहिश्यासह नवीनतम संयुक्त मोजणी आदेशित करणे उचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

१. वादीचा नि.२७ अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. तालुका निरीक्षक भुमि अभिलेख, सांगोला यांची यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

३. कोर्ट कमिशनर यांनी डि. सोलापूर, सब. डि. व ता. सांगोला पैकी शहर सांगोला म्युनसिपल हद्दीतील वादीची जमिन सर्वे नंबर ५३८/१ व प्रतिवादीची जमिन सर्वे नंबर ६६२ या जमिनींची पोटहिश्यासह संयुक्त मोजणी करुन त्याबाबतचा अहवाल व नकाशा दोन महिन्याच्या कालावधीत दाखल करावा.

४. वादीने कोर्ट कमिशनला लागणारी सर्व कागदपत्रे पुरवण्याबाबत आदेश देण्यात येत आहे.

५. कोर्ट कमिशनचा खर्च वादी यांनी सोसायचा आहे.

६. पुढील कार्यवाहीसाठी वादीस न्यायालय आयुक्ताचे रिट अदा करावे.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2026.03.30 14:59:51 +0530

सांगोला
दिनांक – १३/०३/२०२६

**( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )**
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, सांगोला

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Mrs. B. M. Potdar,<br>Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 30/03/2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 30/03/2026 |